## श्रद्धांजली

### वसंत लोळगे



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** येथील सुवर्णकार समाजातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वसंत दगडूशेठ लोळगे (वय ७७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन पुतणे, दोन पुतण्या, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार सुधीर लोळगे यांचे ते चुलते होत.

### रामचंद्र बनकर



**खैरी निमगाव (वार्ताहर)–** श्रीरामपूर तालुक्यातील खैरी निमगाव येथील रामचंद्र हनुमंता बनकर (वय ७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील रमेश बनकर तसेच सुनीता लोखंडे, नंदा माळवदे, प्रमिला शिंदे यांचे ते वडील होत.

### नानासाहेब जेजुरकर



**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील अस्तगाव येथील नानासाहेब कोंडाजी जेजुरकर (वय ७३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. अस्तगावच्या माजी उपसरपंच प्रमिला जेजुरकर यांचे ते पती होत.

### मथुराबाई तुरकणे



**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील पिंपळवाडी येथील मथुराबाई आप्पासाहेब तुरकणे (वय ९०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. प्रगतिशील शेतकरी चंद्रकांत तुरकणे व माजी सरपंच लक्ष्मण तुरकणे, गणेश कारखान्यातील शेतकी अधिकारी शरद तुरकणे यांच्या त्या मातोश्री होत.

### वेणूनाथ माळी



**पाचेगावफाटा (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील पाचेगाव येथील तसेच नेवासा पंचायत समितीचे माजी सभापती वेणूनाथ एकनाथ माळी (वय ६९) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, एक बहीण, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. गावातील गोरक्षनाथ, द्वारकानाथ व काशिनाथ माळी यांचे ते बंधू तर अजय माळी यांचे वडील होत.

### चंद्रभान आढाव



**आरडगाव (वार्ताहर)–** राहुरी तालुक्यातील माहेगाव येथील चंद्रभान काशिनाथ आढाव (वय ९०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते शिवाजी, शरद व नवनाथ आढाव यांचे वडील होत.

## नेवासा शहर भाजपा मंडल अध्यक्षपदी मनोज पारखे



**नेवासा (शहर प्रतिनिधी)–** नेवासा शहरातील भाजपाचे युवक नेते मनोज पारखे यांची नेवासा शहर भाजपा मंडल अध्यक्षपदी निवड करण्यात आली. भाजपच्या संघटनात्मक संरचना बूथस्तरापासून नियुक्तीचा कार्यक्रम सुरू आहे त्याचाच एक भाग म्हणून गेल्या काही दिवसांपूर्वी नेवासा विधानसभा मंडल अध्यक्ष निवडणुकीसाठी भाजपचे निवडणूक प्रमुख राजेंद्र गोंदकर यांच्या आदेशानुसार शिर्डी येथील अशोक पवार व किरण बोराडे हे भाजपचे प्रदेश पदाधिकारी नेवासा येथे आले होते व त्यांनी भाजपच्या सक्रिय सदस्यांकडून मंडल अध्यक्षांच्या निवडीसाठी आपल्या पसंतीच्या कार्यकर्त्यांच्या नावाचे फॉर्म भरून घेतले होते. यामध्ये नेवासा शहर मंडळातील जवळपास सर्वच सक्रिय सदस्यांनी भाजपा नेते मनोज पारखे यांच्या नावाची शिफारस केली होती. तसा अहवाल राजेंद्र गोंदकर यांनी प्रदेश कार्यालयात पाठवला होता. त्यानंतर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आदेशाने मनोज पारखे यांची नेवासा शहर मंडल अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. निवडीबद्दल आमदार विठ्ठलराव लंघे, पंचगंगा उद्योग समुहाचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, भाजपा नेते ज्ञानेश्वर पेचे, ऋषिकेश शेटे, सचिन देसरडा, भाजपा प्रदेश सचिव निरंजन डहाळे, डॉ लक्ष्मण खंडाळे, बाळासाहेब कराळे, राजेश कडू यांनी पारखे यांचे अभिनंदन केले.

# श्रीरामपुरात पोलिसास बसमधून खाली उतरवून मारहाण

## दोघांविरुद्ध गुन्हा दाखल; आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात सेवेत असलेले पोलीस कॉन्स्टेबल सचिन रुपचंद दुकळे हे छत्रपती संभाजीनगर येथे उच्च न्यायालयाच्या कामकाजासाठी एसटी बसने जात असताना दोघांनी त्यांची मोटारसायकल बसला आडवी लावून बस थांबून श्री दुकळे यांना बसमधून खाली उतरवून संभाजीनगरला गुन्ह्याचे कागदपत्र जमा करायला कसा जातो तेच पाहतो असे बोलून शासकीय कामात अडथळा आणून धक्काबुक्की, शिवीगाळ दमदाटी करून बेदम मारहाण केली. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना दोन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

संकेत राजनाथ यादव, सर्वेश राजनाथ यादव असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहे. पोलीस कॉन्स्टेबल सचिन रुपचंद दुकळे हे श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन गुरनं १०२८/२०२४ भा.न्या. सं क ११९(१) वगैरे दाखल गुन्ह्यातील वरिष्ठाच्या आदेशाने उच्च न्यायालयाकडील बेल ॲप्लिकेशन नं. ५२५/२०२५ चे कागदपत्रे व म्हणणे देण्यासाठी शासकीय गणवेशात छत्रपती संभाजीनगर येथे जाणारी बस पकडण्यासाठी श्रीरामपूर बसस्थानक येथे गेले होते. ते बसची वाट बघत उभे असताना त्यांना पोलीस स्टेशन येथील पोलीस कॉन्स्टेबल राहुल पौळ हे भेटले. त्यांनाही नेवासा येथे जायचे होते. सुमारे ०९.३० च्या सुमारास श्रीरामपूर बस स्थानकात शिर्डी–छत्रपती संभाजीनगर येथे जाणारी बस आली व बसमधील प्रवासी खाली उतरले असता त्यातील शेवटचा एक अनोळखी प्रवासी हा बस दरवाजाच्या शेवटच्या पायरीवर आला व त्याने दरवाजाला हात आडवा लावून उभा राहीला व पोलीस दुकळे बसमध्ये चढत असताना त्याने त्यांना धक्का देवून बाजुला लोटले तेव्हा दुकळे त्याला बोलले तु एकटाच राहीला आहे. मला वर चढू दे तेव्हा त्याने पोलीस दुकळे यांच्या शर्टाची गच्ची धरून त्यांना बसच्या खाली लोटले. तेव्हा त्यांना पोकॉ/राहुल पौळ यांनी आधार दिला व आम्ही पोलीस असून मला उच्च न्यायालय खंडपीठ येथे शासकीय कामासाठी जायचे आहे. मला जाऊ दे असे त्यास सांगितले. सदर व्यक्तीने यावेळी शिवीगाळ करून वाद घातला. तेव्हा इतर प्रवाशांनी त्या अनोळखी प्रवासी इसमाला त्या ठिकाणाहून काढून दिले व सगळे बसमध्ये बसले. ही बस नेवासा रोडवरील पाटणी विद्यालयासमोर आली असता बस चालकाने अचानक ब्रेक दाबले व बस थांबली. दोन इसमांनी बसला गाडी आडवी लावली. बस स्थानकात हुज्जत घातलेला व पोलीस दुकळे यांना धक्काबुक्की केलेला अनोळखी इसम तसेच त्याच्यासोबत आणखी एक अनोळखी इसम हे बसमध्ये चढले व पोलीस कॉन्स्टेबल दुकळे यांना बळजबरीने बसमधून खाली उतरवले. तेव्हा त्यांच्याबरोबर असलेले पोलीस कॉन्स्टेबल राहुल पौळ हे पण खाली उतरले. तु संभाजीनगरला गुन्ह्याचे कागदपत्र जमा करायला कसा जातो तेच पाहतो असे बोलून शासकीय कामात अडथळा आणत दुकळे यांना धक्काबुक्की, शिविगाळ दमदाटी करत बेदम मारहाण केली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल सचिन रुपचंद दुकळे यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी संकेत राजनाथ यादव, सर्वेश राजनाथ यादव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दोघा आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## गिरमेवस्ती शाळेतील बालांकुर पुस्तकाचे प्रकाशन



**जेऊर कुंभारी (वार्ताहर)–** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गिरमेवस्ती येथे इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या बालांकुर या पुस्तकाचे प्रकाशन मारुती मंदिर झी मराठी सारेगमप लिटिल चॅम्प्सच्या विजेती गायिका गौरी पगारे हिच्या उपस्थितीत पार पडले.

प्रास्ताविक बालांकुरचे संपादक सुदाम साळुंके यांनी केले. अध्यक्षस्थानी जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे होते. प्रमुख पाहुण्या गायिका गौरी पगारे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. गौरी पगारे यांनी लोकप्रिय गीतांनी कार्यक्रमात रंगत भरली. ती म्हणाली, मोठे होण्यासाठी केवळ पैशाची गरज नसते तर जिद्द, मेहनत आणि चिकाटीची आवश्यकता असते. त्यांनी मुलांशी व पालकांशी संवाद साधला आणि त्यांना मार्गदर्शन केले.

हनुमंतराव भोंगळे यांनी गिरमेवस्ती शाळेच्या शैक्षणिक दर्जाचे आणि विविध उपक्रमांचे कौतुक केले. मुलांनी मुलांसाठी पहिले पुस्तक तयार करण्याचा विक्रम गिरमेवस्ती शाळेने केला आहे. यासाठी सुदाम साळुंके यांनी घेतलेल्या परिश्रमांचे त्यांनी कौतुक केले. शिवाजीराव वक्ते, भीमराज वक्ते, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सुवर्णा चव्हाण, बाळासाहेब वक्ते, रावसाहेब लांडे, संजय दुशिंग, संजय दहिफळे, मिथून चव्हाण, पाटीलबा वक्ते आदी उपस्थित होते. याप्रसंगी इयत्ता पाचवीच्या कु. शुभांगी गायकवाड, कु. त्रिशा मोहन आणि कु. श्रावणी चव्हाण, साई वक्ते व सहजानंद वक्ते या विद्यार्थ्यांनी प्रभावी आत्मविश्वासपूर्वक मनोगत व्यक्त केले. या पुस्तक निर्मितीसाठी गटशिक्षणाधिकारी शबाना शेख आणि गटविकास अधिकारी संदीप दळवी यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन इयत्ता पाचवीच्या शुभांगी गायकवाड, त्रिशा मोहन आणि श्रावणी चव्हाण या विद्यार्थिनींनी केले. मुख्याध्यापिका प्रियंका जोशी यांनी आभार मानले.

## कोपरगाव नगरपालिका शिक्षकांचा सन्मान

**कोपरगाव (प्रतिनिधी)–** प्राथमिक शिक्षकांसाठी कॉम्प्युटेशनल थिंकिंग, कोडींग यांसारख्या घटकांवर ब्लेंडेड कोर्से तयार करण्यात आले होते. यामध्ये नगरपालिका शिक्षण मंडळ, कोपरगाव येथील शिक्षक सुनिता इंगळे व नवनाथ सूर्यवंशी यांनी मेंटोर टीचर म्हणून यश मिळवले तर नसरीन इनामदार व अर्जुन शिरसाट यांनी कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांनी २१ व्या शतकातील कौशल्ये आत्मसात करावी व त्याबरोबरच मुलांमध्ये संगणकीय विचार, सहयोग, सांघिक कार्य, तार्किक कार्य आणि कोडींग याचे ज्ञान अवगत व्हावे, यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग व लीडरशीप फॉर इक्विटी यांच्या संयुक्त विद्यमाने



अहिल्यानगरमध्ये मेझॉन फ्युचर इंजिनियर प्रकल्प २०२३–२४ या वर्षापासून राबवला जात आहे. या प्रकल्पांतर्गत प्राथमिक शिक्षकांसाठी कॉम्प्युटेशनल थिंकिंग, स्क्रॅच कोडींग यांसारख्या घटकांवर ब्लेंडेड कोर्स तयार करण्यात आले होते. यामध्ये नगरपालिका शिक्षण मंडळ कोपरगाव येथील शिक्षकांनी यश संपादित केले. सुनीता इंगळे व नवनाथ सूर्यवंशी यांनी मेंटोर टीचर म्हणून यश मिळवले. नसरीन इनामदार व अर्जुन शिरसाट यांनी कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केले. या शिक्षकांना प्रत्येकी दोन टॅबलेट व प्रमाणपत्र जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी विस्तार अधिकारी जयश्री कार्ले, रविराज निंबाळकर, दिलीप कासार व प्रा. रामेश्वर लोटके उपस्थित होते. याप्रसंगी मुख्याध्यापक विलास माळी, सुनील रहाणे, अमोल कडू उपस्थित होते. नगरपालिका शिक्षण मंडळ, मुख्याधिकरी सुहास जगताप, गटशिक्षणाधिकारी शबाना शेख यांनी यशस्वी शिक्षकांचे अभिनंदन केले.

## मियासाहेब पतसंस्थेला सव्वा कोटींचा नफा- निमसे



**टाकळीमिया (वार्ताहर)–** राहुरी तालुक्यात अग्रगण्य असलेल्या टाकळीमिया येथील मियासाहेब ग्रामीण बिगर शेती सह पतसंस्थेस सन.२०२४–२०२५ या अर्थीक वर्षात १ कोटी २६ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहती संस्थेचे अध्यक्ष शामराव निमसे यांनी दिली आहे.

याबाबत निमसे यांनी सांगितले की, संस्थेचा समाधानकारक वसूल झाला. संस्थेच्या आर्थीक वर्षात १६८ कोटी १७ लाख २६ हजारांच्या रुपयांच्या ठेवी जमा झालेल्या आहेत. कर्ज ९४ कोटी ७ लाख ४२ हजार रुपये, गुंतवणूक ६० कोटी ३५ लाख ९३ हजार रुपये असुन संस्थेने उलाढालीचा ८०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे. संस्था अर्थीक व्यवहार सांभाळून सामाजिक, क्षैक्षणीक व धार्मिक कार्यात आघाडीवर आहे. या मधे अनाथ आश्रमातील मुलांना अन्नदानासाठी मदत, क्रिडा क्षेतातील मुलांच्या विकासासाठी बक्षीस योजना गुणवंत विद्यारर्थ्यांना स्व.शंकरराव निमसे स्मृती पुरस्कार प्रदान केला जातो. तसेच सभासद व ग्रामस्थांसाठी आरोग्य शिबीर नेत्र शिबिराचे आयोजन केले जाते. या व्यतिरिक्त संस्थेच्या ग्राहकांना जास्तीत जास्त सुविधा देणे कामी संस्थेने ऑनलाईन सुविधा, तसेच खातेदारांना संदेश सुविधा तसेच खातेदारांना ऑनलाईन सेव्हिंग खाते लवकरच उपलब्ध करुन देण्यात असल्याचे निमसे यांनी सांगितले. संस्थेच्या यशस्वी वाटचालीत संस्थेचे व्यवस्थापक अनिरुद्ध लोखंडे, संचालक मंडळ, शाखांचे शाखाधिकारी तसेच कर्ज वसुली अधिकारी यांचा मोलाचा वाटा आहे.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक शिंदे, संचालक किशोर सोनवणे, गिताराम चोथे, बाळासाहेब निमसे, गोपीनाथ जुंदरे, अशोक गोसावी, गजानन निमसे, मधुकर सगळगिळे, अर्चना शिंदे, अनिता मोरे उपस्थितीत होते.

## ना. विखे पाटील यांच्या हस्ते यश नवलेचा सन्मान

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** सुरत येथे पार पडलेल्या आशियाई पावरलिफ्टिंग चाम्पियनशिप २०२५ स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेल्या यश मनोज नवले पाटील याचा येथील खा.गोविंदराव आदिक सभागृहात राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याहस्ते गौरवपत्र व मेडल देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी विखे यांनी यश नवले याचे कौतुक करत श्रीरामपूर तालुक्याचे नाव देशात कमविले असून तू असेच नाव कमावत जा, तुला पाहिजे ते आर्थिक सहाय्य मी करीन, तुला कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. मी सदैव तुझ्या पाठीशी असून काळजी करायचे कारण नाही, असे आश्वासन ना. विखे यांनी दिले. तुझे वडील मनोज नवले देखील एक उत्तम



खेळाडू असून यापुढे देखील त्यांच्या मार्गदर्शन तुला गरज आहे. तुझ्यात मेहनत करण्याची तयारी असून जिद्द आणि आत्मविश्वास आहे. असेही ना. विखे पाटील यावेळी म्हणाले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब कोळेकर, क्रीडा जिल्हाधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, विविध क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिपक पटारे, आशिष बोरावके, यश बोरावके, जयश्री थोरात, सुनील साठे, सूर्यकांत सगम, सुनिल साळुंके, अनिल छाबडा, प्रविण गुलाटी, प्रमोद पत्की, कविता दूबे, डॉ.विजय त्रिभुवन, सुनील शेळके, जगन्नाथ हरार, किशोर फाजगे, सेवानिवृत्त तहसीलदार राजेंद्र नवले, लता नवले, सुप्रिया नवले आदी उपस्थित होते.

## राजुरीत बिरोबा महाराजांची यात्रा उत्साहात साजरी



**राजुरी (वार्ताहर)–** राजुरी येथील आराध्य दैवत बिरोबा महाराज यात्रा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

राहाता तालुक्यातील राजुरी येथील सालाबादप्रमाणे बिरोबा महाराजांची यात्रा मंगळवारी मोठ्या उत्साहात पार पडली. सकाळी पुणतांबा येथून आणलेल्या पाण्याने बिरोबा महाराजांच्या मूर्तीला अभिषेक घालून विधिवत पूजा करण्यात आली. यानंतर काठीचे पूजन उपसरपंच तसेच विखे कारखान्याचे संचालक डॉ. सोमनाथ गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दामू गोरे, जालिंदर गोरे, शिवाजी गोरे, गजानन गोरे, सोमनाथ गोरे, शिवनाथ गोरे, कान्हा आदक, सनी गोरे, पप्पू गोरडे, युवक कार्यकर्ते रमेश गोरे, सखाराम गोरे, अण्णासाहेब बेंद्रे, अण्णासाहेब लाळगे यांच्यासह महिला व गावातील मान्यवर मंडळी तसेच पुणतांबा येथे पाणी आणण्यासाठी गेलेले युवक यावेळी उपस्थित होते. संध्याकाळी मिरवणुकीनंतर राजुरी, बाभळेश्वर, चांडेवाडी येथील भाविक व युवकांनी डफ वाद्य, गोल रिंगण, बिरोबा महाराजांचा जयघोष उत्साहात संपन्न झाले. यानंतर सोन्या गोरे व रघुनाथ गोरे, यात्रा कमिटी यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बिरोबा महाराज मंदिर व परिसरात भव्य अशी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच संध्याकाळी फटाक्याची आतिषबाजी करण्यात आली.

## पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा माकपकडून तीव्र निषेध

**अकोले (प्रतिनिधी)–** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिट ब्युरो जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवाद्यांकडून केलेल्या २७ पर्यटकांच्या निर्घृण हत्येचा तीव्र निषेध केला आहे. या हल्ल्यात प्राण गमावलेल्या निष्पाप लोकांच्या कुटुंबियांचे माकप मनापासून सांत्वन करत आहे. या हल्ल्यात अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींनी लवकरात लवकर बरे होण्यासाठी आम्ही सदिच्छा देत आहे, असे माकपचे राज्य सचिव डॉ. नवले यांनी सांगितले.

या भीषण गुन्ह्यातील दहशतवाद्यांना लवकर पकडून शिक्षा झालीच पाहिजे. पोलीस आणि सुरक्षा दल हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहेत. या भ्याड हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या शक्तींना शिक्षा देण्यासाठी केंद्र सरकारने कोणतीही कसर सोडू नये. गुन्हा करणारे हे राष्ट्राचे आणि काश्मीरमधील लोकांचेही शत्रू आहेत. या गजबजलेल्या पर्यटनस्थळावरील सुरक्षेच्या अभावाची आणि या हल्ल्याची सर्व बाजूंनी चौकशी करणे केंद्र सरकारचे कर्तव्य आहे. या दु:खद काळात सर्व कट्टरवादी सांप्रदायिक शक्तींविरुद्ध माकप भारतीय जनतेसोबत एकजुटीने उभा आहे, असा विश्वास डॉ. अजित नवले यांनी व्यक्त केला आहे.

## शिवप्रहारकडून दहशतवादी हल्ल्याचा निषेध



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** जम्मू–काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा येथील शिवप्रहार प्रतिष्ठानकडून निषेध करत पाकिस्तानचा राष्ट्रध्वज रॅलीद्वारे रस्त्यावरून फडफडत नेण्यात आल्या. ही रॅली बेलापूर रोडवरून छत्रपती शिवाजी महाराज रोड, मेनरोडने रॅली राम मंदिर चौकात आली व तेथे पाकच्या राष्ट्रध्वजाचा जाळून निषेध करण्यात आला. यावेळी पाकिस्तान मुर्दाबाद हिंदुस्तान जिंदाबादच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी शिवप्रहार प्रतिष्ठानचे मावळे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दहशतवादी हल्ल्याचा भाजपकडून निषेध



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** जम्मू–काश्मीर येथील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा भाजपाचे माजी नगरसेवक रवी पाटील, माजी नगरसेवक दीपक चव्हाण, मोरया फाउंडेशनचे अध्यक्ष केतन खोरे यांनी निषेध करत शहरातील महात्मा गांधी पुतळा येथे पाकिस्तानचा झेंडा जाळला. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले.

यावेळी रविराज बेलदार, योगेश ओझा, प्रविण लिप्टे आदींची भाषणे झाली. याप्रसंगी बाजार समिती संचालक नाना शिंदे, विराज भोसले, बाबासाहेब शेटे, दत्ता जाधव, सूर्यकांत तांबडे, राजेंद्र ओहोळ, योगेश बनकर, किरण उईके, विशाल रुपनर, राजेंद्र चव्हाण, सागर म्हस्के, विशाल ठाणगे, चांगदेव देखणे, नवनाथ पवार, किरण सिंग टाक, चंदन सिंग जुनी, मच्छिंद्र धोत्रे, योगेश व्यवहारे, सागर जाधव, किरण पठारे, प्रकाश सडमाके, पृथ्वी चव्हाण, शिवम चव्हाण, तुषार परदेशी, अवधूत शिंदे, ऋषिकेश पाटील, कार्तिक मंडवे, राहुल राऊत, संकेत पाटील, पराग फोपळे, अमित कांबळे, भारत शिरसाठ, तेजस गायकवाड, योगेश मिश्रा, युवराज वाघ, सिद्धांत पाटील, उमेश बिडवे, विजय पाटील, कुणाल कुंभकर्ण, दर्शन पाटणी, शंतनू गोराणे, सचिन डोफे, शरद शिंदे, श्री.वाकचौरे, कुणाल दहिटे, संकेत नागरे, संदीप गुंजाळ, लखन गायकवाड आदी उपस्थित होते.